सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

माजी सैनिक वसाहती जवळ, एम.आय.डी.सी.एरिया, विद्यानगर, मिरज-४१६ ४१०.
दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३) २२३१४२३ कार्यालय (०२३३) २२३१२६९
(Email : gpmiraj@gmail.com) (Website : www.gpmiraj.ac.in)

जा.क्र.:-शातंमि/वि.वि/आर्थिक सहाय्य योजना/२०२३-२४/ 2282 दिनांक 30 NOV 2023

**परिपत्रक :-**

**विषय** - शैक्षणिक वर्ष २०२३-२४ विद्यार्थी आर्थिक सहाय्य योजनेबाबत..

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये संस्थेतील सर्व विभाग प्रमुख व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की,आपल्या संस्थेमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी हे महाराष्ट्रातील विविध ग्रामीण भागातून आलेले असतात. अनेक विद्यार्थ्यांची कौटुंबिक आर्थिक स्थिती हलाखीची असते. त्यांना शैक्षणिक दृष्टया आर्थिक मदत मिळण्यासाठी व शैक्षणिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सदर योजनेची निर्मिती केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन मिळेल. संस्थेस विविध स्त्रोतातून मिळालेल्या आर्थिक देणगीतून विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करणे या योजनेचा उद्देश आहे.

विद्यार्थी आर्थिक सहाय्य योजनेबाबतचे निकष, गुणांची विभागणी, शैक्षणिक गुणवत्ता, कुटुंबाची आर्थिक स्थिती , अनाथ स्थिती, दिव्यांग स्थिती,खेळाडु, तसेच आर्थिक सहाय्य योजना छाननी समिती गुणदान तक्ता, मुलाखत समिती गुणदान तक्ता, आर्थिक सहाय्य योजना अर्ज याबाबची सविस्तर माहिती व अर्ज नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे.

तरी संस्थेतील सदर योजनेस पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज दि. / /२०२३ पर्यंत भरून कार्यालयात विद्यार्थी विभागात जमा करावेत. २८/१२/२०२३

कॅप्टन डॉ.नि.पां.सोनजे.
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,मिरज.

प्रति:- सर्व विभाग प्रमुख/प्र.विभागप्रमुख/प्र.आधिकारी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
२/-सदरचे परिपत्रक आपले विभागातील आधिकारी, कर्मचाऱ्यांच्या व सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावे.

| | | | |
|---|---|---|---|
| १)स्थापत्य विभाग | २) यंत्र विभाग | ३) संगणक विभाग | ४) मेडि ईलेक्टॉनिक्स विभाग |
| ५)प्लास्टीक(पॉलिमर)विभाग | | | |

प्रत:- १.विद्यार्थी नोटीस बोर्ड
२.श्री.काळे एस.पी.प्रोग्रमर यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

Scanned with OKEN Scanner

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

माजी सैनिक वसाहती जवळ, एम.आय.डी.सी.एरिया, विद्यानगर, मिरज-४१६ ४१०.
दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३) २२३१४२३ कार्यालय (०२३३) २२३१२६९
(Email : gpmiraj@gmail.com) (Website : www.gpmiraj.ac.in)

दिनांक :- ०५/१०/२०२३

## शासकीय तंत्रनिकेतन मिरज, आर्थिक सहाय्य योजना

❖ **उद्देश** : शासकीय तंत्रनिकेतन, मिरज मध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी हे महाराष्ट्रातील विविध ग्रामीण भागातुन आलेले असतात. अनेक विद्यार्थांची कौटुंबिक आर्थिक स्थिती हलाखीची असते. त्यांना शैक्षणिक दृष्ट्या आर्थिक मदत मिळणेसाठी व शैक्षणिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सदर योजनेची निर्मिती केली आहे. त्यामुळे त्यांच्यातील शैक्षणिक गुणवत्तावाढीस प्रोत्साहन मिळेल. संस्थेस विविध स्त्रोतातून मिळालेल्या आर्थिक देणगीतून विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

❖ **नाव : शासकीय तंत्रनिकेतन मिरज, आर्थिक सहाय्य योजना**

❖ **योजनेचे निकष**

- सदर योजना संस्थेतील सर्व नियमित प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी खुली असेल.
- अर्ज करणेचे वेळी संस्थेतील उपस्थिती ७५% पेक्षा जास्त असणे आवशक आहे. ( विभागप्रमुख यांचे प्रमाणपत्र )
- सदर योजनेत खालील बाबींचा विचार करणेत येईल.
  - शैक्षणिक गुणवत्ता ( मागील शैक्षणिक वर्षातील गुण /सत्र पध्दतीसाठी दोन्ही सत्रांचे एकत्रित गुण )
  - कुटुंबाची आर्थिक स्थिती
  - अनाथ
  - दिव्यांग
  - खेळाडू / अभ्यासक्रमेत्तर क्रियाकल्प

❖ **गुणांची विभागणी**

१. **शैक्षणिक गुणवत्ता ( जास्तीत जास्त २० गुण )**

| अ.क्र. | मागील वार्षिक गुण (सत्र पध्दतीसाठी दोन्ही सत्रांचे एकत्रित गुण) | गुण |
|---|---|---|
| १. | ९० टक्के पेक्षा जास्त | २० गुण |
| २. | ८० ते ८९.९९ टक्के | १५ गुण |
| ३. | ७० ते ७९.९९ टक्के | १० गुण |
| ४. | ६० ते ६९.९९ टक्के | ०५ गुण |
| ५. | ६० टक्के पेक्षा कमी | ०३ गुण |

२. **कुटुंबाची आर्थिक स्थिती ( जास्तीत जास्त २० गुण )**

मा.तहसीलदार यांचे उत्पन्नाचा दाखला ची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न | गुण |
|---|---|---|
| १. | रु ५० हजार पर्यंत | २० गुण |
| २. | रु ५० हजार ते २ लाख पर्यंत | १५ गुण |
| ३. | रु २ लाख पेक्षा जास्त | १० गुण |

३. **अनाथ स्थिती. ( जास्तीत जास्त २० गुण )**

महानगरपालिका/नगरपालिका /ग्रामपंचायत यांनी दिलेला मृत्यूचा दाखला ची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे

| अ.क्र. | कौटुंबिक परीस्थिती | गुण |
|---|---|---|
| १. | आई- वडील दोन्ही हयात नसतील ( अनाथ ) | २० गुण |
| २. | आई वडील दोघां पैकी एकजण हयात असतील ( एकल पालक ) | १० गुण |



Scanned with OKEN Scanner

४. दिव्यांग स्थिती. ( जास्तीत जास्त ०५ गुण )

जिल्हा शैल्यचिकित्सक यांनी दिलेल्या प्रमाणपत्रा ची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | दिव्यांगचे प्रमाण | गुण |
|---|---|---|
| १. | दिव्यांगचे प्रमाण ४० टक्के पेक्षा जास्त | ५ गुण |

५. खेळाडू / अभ्यासक्रमेत्तर क्रियाकल्प ( जास्तीत जास्त १५ गुण )

क्रीडा प्रकार / अभ्यासक्रमेत्तर क्रियाकल्प ज्या संस्थे मार्फत आयोजित केले आहे ती संस्था शासन मान्य / शासन संलग्नीत असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | क्रीडा प्रकार / अभ्यासक्रमेत्तर क्रियाकल्प | वैयक्तिक गुण | सांघीक गुण |
|---|---|---|---|
| १. | आंतर राष्ट्रीय / राष्ट्रीय | १५ गुण | १३ गुण |
| २. | राज्य / विभागीय | १० गुण | ०५ गुण |
| ३. | जिल्हा | ०८ गुण | ०४ गुण |
| ४ | संस्थास्तर | ०६गुण | ०३ गुण |

❖ कार्यपद्धती

१) सदरचे आर्थिक सहाय्यची रक्कम व संख्या मा. प्राचार्य, विभाग प्रमुख व प्रबंधक यांच्या बैठकीत ठरविण्यात येईल, तदनंतर विद्यार्थांचे मागणी अर्ज मागविले जातील.

२) सदरची निवड विद्यार्थांचे अर्ज मागवून छाननी समितीद्वारे अर्जांची छाननी करून गुणदान करून मुलाखतीसाठी १ : ३ या प्रमाणत शिफारशी करण्यात येतील.

३) सदर आर्थिक सहाय्य योजनेसाठी आलेल्या अर्जाची छाननी करून मुलाखती साठी विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता माननीय प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, मिरज यांचे मार्फत खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येईल.

- ➢ विभागप्रमुख (सेवा जेष्ठ विभागप्रमुख ) अध्यक्ष
- ➢ सेवा जेष्ठ विभागप्रमुख यांच्या विभागा व्यतिरिक्त सेवा जेष्ठ एक पुरुष अध्यापक
- ➢ उपरोक्त दोन्ही विभागा व्यतिरिक्त सेवा जेष्ठ एक महिला अध्यापक
- ➢ सेवा जेष्ठ दिव्यांग अध्यापक ( पुरुष / महिला )
- ➢ प्रबंधक ( सदस्य सचिव )

४) छाननी समितीने शिफारस केलेल्या विद्यार्थांची मुलाखत माननीय प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन मिरज यांचे मार्फत खालील प्रमाणे गठीत केलेल्या समिती मार्फत घेण्यात येईल. ( मुलाखत जास्तीत जास्त २० गुण )

- ➢ प्राचार्य - अध्यक्ष
- ➢ सेवा जेष्ठ दोन विभाग प्रमुख - सदस्य.

५) सदर मुलाखत समिती छाननी समितीने दिलेल्या गुणांची पुनश्च पडताळणी करेल.

६) मुलाखत समिती उपरोक्त अ.क्र.०१ नुसार रक्कम व संख्या कमी /जास्त झाले तर त्याची कारण नमूद करेल.

७) विद्यार्थाची अर्ज संख्या कमी आल्यास अथवा प्राचार्यांना आवश्यकता वाटल्यास इतर कोणत्याही विद्यार्थ्यांचे योग्य त्या प्रमाणपत्रांसह / कागदपत्रांसह नामनिर्देशन करू शकतील. मात्र अशा विद्यार्थ्यांची छाननी समिती मार्फत पडताळणी होईल.

८) उपरोक्त दोन्ही समितीने दिलेले गुणदान एकत्रित करून विद्यार्थ्यांची यादी निश्चितकरून मा. प्राचार्य अंतिम मान्यता देतील.

गरीब विद्यार्थांना अर्थसहाय्य नियमावली समिती

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | समितीमधील पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | श्री. बा. बा. लडगे, अधि. उपयोजित यंत्र | समन्वयक | |
| २ | श्री. सं. भ. सोनवले, अधि. यंत्र | सदस्य | |
| ३ | डॉ. व्यं. सं. मगर, अधि. इंग्रजी | सदस्य | |
| ४ | डॉ. यु. प्रे. चौहान, अधि. प्लॅस्टिक आणि पॉलिमर | सदस्य | |
| ५ | डॉ. रा. म. ओहळ, अधि. वैद्यकीय अणुविद्युत | सदस्य | |
| ६ | श्रीमती प्री. वि. तोरस्कर, अधि. संगणक | सदस्य | |



Scanned with OKEN Scanner

गुण

# शासकीय तंत्रनिकेतन मिरज,

## आर्थिक सहाय्य योजना छाननी समिती गुणदान तक्ता

१. विद्यार्थ्याचे नाव व मोबाईल नंबर

२. विद्या शाखा व सत्र/वर्ष

❖ गुणांची विभागणी

१ शैक्षणिक गुणवत्ता (जास्तीत जास्त २० गुण)

| अ.क्र. | मागील वार्षिक गुण (सत्र पध्दतीसाठी दोन्ही सत्रांचे एकत्रित गुण) | गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | ९० टक्के पेक्षा जास्त | २० गुण | |
| २. | ८१ ते ८९.९९ टक्के | १५ गुण | |
| ३. | ७० ते ७९.९९ टक्के | १० गुण | |
| ४. | ६० ते ६९.९९ टक्के | ०५ गुण | |
| ५. | ६० टक्के पेक्षा कमी | ०३ गुण | |

२ कुटुंबाची आर्थिक स्थिती (जास्तीत जास्त २० गुण)

मा.तहसीलदार यांचे उत्पन्नाचा दाखला ची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न | गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | रु ५० हजार पर्यंत | २० गुण | |
| २. | रु ५० हजार ते २ लाख पर्यंत | १५ गुण | |
| ३. | रु २ लाख पेक्षा जास्त | १० गुण | |

३ अनाथ स्थिती. (जास्तीत जास्त २० गुण)

महानगरपालिका/नगरपालिका /ग्रामपंचायत यांनी दिलेला मृत्यूचा दाखला ची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे

| अ.क्र. | कौटुंबिक परीस्थिती | गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | आई- वडील दोन्ही हयात नसतील (अनाथ) | २० गुण | |
| २. | आई वडील दोघां पैकी एकजण हयात असतील (एकल पालक) | १० गुण | |

४ दिव्यांग स्थिती. (जास्तीत जास्त ०५ गुण)

जिल्हा शैल्यचिकित्सक यांनी दिलेल्या प्रमाणपत्रा ची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | दिव्यांगचे प्रमाण | गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | दिव्यांगचे प्रमाण ४० टक्के पेक्षा जास्त | ०५ गुण | |

५ खेळाडू / अभ्यासक्रमेत्तर क्रियाकल्प (जास्तीत जास्त १५ गुण)

क्रीडा प्रकार / अभ्यासक्रमेत्तर क्रियाकल्प ज्या संस्थे मार्फत आयोजित केले आहे ती संस्था शासन मान्य / शासन संलग्नीत असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | क्रीडा प्रकार / अभ्यासक्रमेत्तर क्रियाकल्प | वैयक्तिक गुण | सांघीक गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|
| १. | आंतर राष्ट्रीय / राष्ट्रीय | १५ गुण | १३ गुण | |
| २. | राज्य / विभागीय | १० गुण | ०५ गुण | |
| ३. | जिल्हा | ०८ गुण | ०४ गुण | |
| ४ | संस्थास्तर | ०६ गुण | ०३ गुण | |

❖ विशेष बाबी. (असल्यास)

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | समितीमधील पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | श्री. बा. बा. लडगे, अधि. उपयोजित यंत्र | समन्वयक | |
| २ | श्री. सं. भ. सोनवले, अधि. यंत्र | सदस्य | |
| ३ | डॉ. व्यं. सं. मगर, अधि. इंग्रजी | सदस्य | |
| ४ | डॉ. यु. प्रे. चौहान, अधि. प्लॅस्टिक आणि पॉलिमर | सदस्य | |
| ५ | डॉ. रा. म. ओहळ, अधि. वैद्यकीय अणुविद्युत | सदस्य | |
| ६ | श्रीमती प्री. वि. तोरस्कर, अधि. संगणक | सदस्य | |



Scanned with OKEN Scanner

# शासकीय तंत्रनिकेतन मिरज,

## आर्थिक सहाय्य योजना मुलाखत समिती गुणदान तक्ता

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | छाननी समितीने दिलेले गुण | मुलाखत समितीने गुणांची पुनश्च छाननी समितीच्या गुणांची पडताळणी करून मिळालेले गुण (८० पैकी) | मुलाखतीचे सरासरी गुण (२० पैकी) | एकूण (१०० पैकी) | गुणानुक्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

दिनांक :-

Scanned with OKEN Scanner

# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.

## आर्थिक सहाय्य योजना अर्ज

फोटो

विद्यार्थ्याचे नाव :-
मोबाईल नं. :-
विद्याशाखेचे नाव :-
सत्र / वर्ष :-
दिनांक :-

प्रति,

मा. प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.

विषय :- शासकीय तंत्रनिकेतन, मिरज आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ मिळणे बाबत...

महोदय,

मी शासकीय तंत्रनिकेतन, मिरज या विद्याशाखेत शिकत आहे. मी शासकीय तंत्रनिकेतन, मिरज आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ मिळणे बाबत विनंती आर्ज करीत आहे. या योजनेच्या निकषा नुसार मी खालीलप्रमाणे कागदपत्रे

| अ.क्र. | निकष | लागणारे कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक गुणवत्ता | गुण पत्रिका (सत्र पध्दतीसाठी दोन्ही सत्रांचे | आहे / नाही |
| २ | कुटुंबाची आर्थिक स्थिती | मा.तहसीलदार यांचे उत्पन्नाचा दाखला ची साक्षांकित प्रत | आहे / नाही |
| ३ | अनाथ स्थिती | महानगरपालिका/नगरपालिका /ग्रामपंचायत यांनी दिलेला मृत्यूचा दाखला ची साक्षांकित प्रत | आहे / नाही |
| ४ | दिव्यांग स्थिती | जिल्हा शैल्यचिकित्सक यांनी दिलेल्या प्रमाणपत्रा ची साक्षांकित प्रत | आहे / नाही |
| ५ | खेळाडू / अभ्यासक्रमेत्तर क्रियाकल्प | क्रीडा प्रकार / अभ्यासक्रमेत्तर क्रियाकल्प ज्या संस्थे मार्फत आयोजित केले आहे ती संस्था शासन मान्य / शासन संलग्नीत संस्थेचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत | आहे / नाही |

तरी माझा या शासकीय तंत्रनिकेतन, मिरज आर्थिक सहाय्य योजने साठी सहानुभूती पूर्वक विचार करावा ही नम्र विनंती .

विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी

सोबत :- वरीलप्रमाणे सर्व कागदपत्रे

१.
२.
३.
४.
५.

Scanned with OKEN Scanner